

**अनुराधा सोळंकी**

**महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त ( 2021- 22)**

**पुरवठा विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा.**

**"शिस्त काय असते हे तर आमचे महाविद्यालय नेहमी सांगत आले आहे"**

नमस्कार, मी अनुराधा सोळंकी ( आंतरराष्ट्रीय व्हीलचेअर तलवारबाजी खेळाडू तसेच शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त 2021- 22) आपल्या एस पी एम कॉलेजमध्ये मी बारावीनंतर प्रवेश घेतला. मी ग्रामीण भागातून आले असल्याकारणाने मला कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती त्यामुळे मी सगळयांना विचारून सर्व कामे करत होती. त्यावेळी ग्रंथालय काय असते ? ती कशाप्रकारे पुस्तके उपलब्ध होतात याची कल्पनाही मला नव्हती, याचे योग्य ते मार्गदर्शन मला आमच्या आदरणीय ग्रंथपाल श्री प्रदीप सर यांनी दिली शिस्त काय असते हे तर आमचे महाविद्यालय नेहमी सांगत आले आहे आणि माझ्यासारखे अनेक विद्यार्थी घडले आहे आणि घडवीत आहे .मला एमपीएससी काय असते यूपीएससी काय असते याची माहिती मला एस पी एम कॉलेज व विशेषतः म्हणजे आपल्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री प्रदीप बारड सर यांच्यामुळेच मला स्पर्धा परीक्षेची ज्ञान प्राप्त झाले त्यामुळेच मी आज जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथील पुरवठा शाखेत कार्यरत आहे त्यावेळी चे योग्य मार्गदर्शन मिळाले व माझ्या जीवनाला योग्य असे वळण मिळाले त्याबद्दल एस पी एम कॉलेज व ग्रंथपाल आदरणीय श्री प्रदीप बारड सर यांचे मनापासून आभार व्यक्त करते खूप खूप धन्यवाद सर तुमच्या मार्गदर्शयामुळेच आम्ही हे यश प्राप्त करू शकले तुम्ही दिलेल्या सहकार्य ,मदत नेहमीच आमच्या न विसरणाऱ्या अशा आठवणीत राहील त्याबद्दल धन्यवाद.

## Shri Vivek Anil Ivarkar, GST Officer, Sambhaji Nagar.

### आयुष्याला दिशा देणारी ग्रंथालयाची वास्तू-

**विवेक अनिल इवरकर**
**(राज्यकर अधिकारी, वस्तू व सेवा कर विभाग, छत्रपती संभाजीनगर).**

*"Libraries store the energy that fuels the imagination. They open up windows to the world and inspire us to explore and achieve, and contribute to improving our quality of life."*

*-Sidney Sheldon*

संपूर्ण शालेय शिक्षण आदर्श विद्यालयातच झाल्याने शि.प्र.म. तात्यासाहेब महाजन महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची इमारत तशी लहानपणापासूनच माझ्या परिचयाची. पण, ग्रंथालयाची हीच इमारत आपल्या आयुष्याला भविष्यात एक वेगळे वळण देणार आहे याची मात्र त्यावेळी कल्पनाही नव्हती. मी चिखलीतील एका Automobile शोरूम मध्ये काम करत असताना, माझे वर्गमित्र मा. श्री. इब्राहीम चौधरी (उपजिल्हाधिकारी) यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार, या ग्रंथालयातील स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेचा सदस्य झालो. तिथे मा. प्रा. प्रदीप बारड सर यांच्यासारखा एक उत्तम मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक लाभला आणि आयुष्याची दिशाच बदलली. स्वतःच्या नियमित कामाचा व्याप सांभाळून, निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या या प्रा. प्रदीप बारड नावाच्या या अवलियाने, आपल्यासारखेच इतरांचेही भले व्हावे या तळमळीने सुरु केलेल्या "स्पर्धा परीक्षा अभ्यासिका" या उपक्रमाच्या सुरुवातीच्या दिवसातील मी एक अभ्यासार्थी होतो.

*"Only libararians like to search, Everyone else likes to find."*

Roy Tennant या प्रख्यात आंतरराष्ट्रीय ग्रंथालय तज्ञाचे हे वाक्य, प्रा. बारड सरांना चपखल लागू पडते. नवनवीन संकल्पना शोधून व त्या राबवून सभोवतालच्या होतकरू तरुणाईला त्याचा लाभ कसा करून देता येईल याचीच धडपड सदोदित त्यांच्या कृतीतून दिसत असे. चिखली सारख्या छोट्या शहरात, आजच्यासारखी स्पर्धा परीक्षांबद्दलची जागरुकता आणि internet ची सुलभ उपलब्धता नसण्याचा तो काळ. "स्पर्धा परीक्षा हा विषय फक्त पुण्यात तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाच आहे. चिखलीत राहून MPSC ची तयारी करणारे काय दिवे लावणार..." अशी हेटाळणी करणाऱ्यांची संख्याच जास्त. मात्र अशाही परिस्थितीत या वाटेने जाण्याचे धाडस केलेल्या ८-१० अभ्यासार्थ्यांच्या गटाला सतत प्रेरणा देऊन उभे करत सरांनी योग्य दिशा दिली. जेमतेम आर्थिक स्थिती असणाऱ्या या मंडळींना, ग्रंथालयात उपलब्ध असणारे उत्तमोत्तम संदर्भग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे सरांनी मुक्तहस्ते उपलब्ध करून दिली. तसे पहिले तर स्पर्धा परीक्षा क्षेत्र म्हणजे मुळातच अनिश्चित करिअर. त्यामुळे उद्भवणाऱ्या शंकाबद्दल विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या पालकांचे नियमित समुपदेशन करणे, नामांकित वक्त्यांना तसेच शासकीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी आमंत्रित करून त्यांची मार्गदर्शन सत्रे आयोजित करणे, नियमित सराव प्रश्नपत्रिका सोडवून घेणे अशा अनेक मार्गांनी त्यांनी अभ्यासार्थ्यांचे मनोबल वाढविले. प्रत्येक अभ्यासार्थ्याने दररोज तसेच वेळेवर अभ्यासिकेत यावे, सकाळ व दुपार दोन्ही सत्रात पूर्णवेळ बसून अभ्यास करावा यावर सरांचा कटाक्ष असे. सोबतच, चारचौघांसमोर बोलण्याची भीड चेपावी, सभाधीटपणा अंगी यावा यासाठी वेळोवेळी गटचर्चा, Book Talk आयोजित करणे असो किंवा आगळावेगळा असा 'विंदोत्सव' (काव्यवाचन) असो; या सर्व उपक्रमांतून व्यक्तिमत्व विकसनाचे नवे धडेच आम्ही सर्वांनी गिरविले.

सरांचा आम्हावरील विश्वास, त्यांनी दिलेला आधार आणि आमची स्वतः ला सिद्ध करून दाखविण्याची धडपड यामुळे आम्हा अभ्यासार्थ्यांच्या गटातील बहुतेक सर्वचजण MPSC वा तत्सम परीक्षांच्या माध्यमातून वेगवेगळ्या शासकीय सेवांमध्ये निवडले गेलो. मी सध्या वस्तू व सेवा कर विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे राज्यकर अधिकारी म्हणून कार्यरत आहे. नंतरच्या काळात सहायक गटविकास अधिकारी म्हणूनदेखील माझी निवड झाली होती.

आज हा सगळा प्रवास आठवतांना, आ. बारड सर आणि शि. प्र. म. तात्यासाहेब महाजन महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या त्या वास्तूचे आमच्या यशातील योगदान विसरणे कधीही शक्य नाही.



**Dr.Avinash Sitaram Nile**

**M.Com., Ph.D., NET, SET, G.D.C. & A., D. Litt. (Hon.)**
**Assistant Professor in Commerce,**
**M.S.P. Arts, Science & K.P.T. Commerce College, Manora,**
**Dist. Washim, 444404.**

**"College and library have contributed significantly to my thought formation."**

***Few words for Dr. Pradip Barad Sir,***

College and library have contributed significantly to my thought formation while I was studying UG in commerce. You're an inspiration to all students. You've activated a hunger for knowledge and wisdom, inspiring me to plan my future and become a better individual. You've been so much more than a teacher for me. You've been my mentor, support and my guide. I still remember, we got the new syllabus for B.Com. and we were asking you for the book, you tried hard to find out the points, but we and you were not satisfied. After all, you wrote a book on the subject yourself. I have never seen such passion from a librarian towards students. As students, many teachers and educators will pass through our lives without remembrance. Yet, a special few will leave a lasting impression. You have worked so hard in shaping me into the student I am today. I thank you for being such an amazing teacher and for all your great lessons. Thank you Sir!



सौ. अरुणा अजित काशिद,

महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त

क्रिडा शिक्षिका,

पवार पब्लिक स्कूल हडपसर पुणे

Email : deshmukharuna04@gmail.com

**"ग्रंथालय म्हणजे एक प्रकारचे वाचन प्रेरणा स्थानच"**

**"S.P.M कॉलेज चे ग्रंथालय म्हणजे एक प्रकारचे वाचन प्रेरणा स्थानच, वाचनाची गोडी लागली ती ईथेच, आणि लावली ती श्री. प्रदीप बारड सरांनी मी तशी फक्त मैदानावरच रमणारी मुलगी असल्याने फारशी पुस्तकांशी मैत्री नव्हतीच पण ती मैत्री करून दिली ती बारड सरांनी अभ्यास आणि खेळाचा ताळमेळ घालायला शिकवला तो सरांनीच या वाचन प्रेरणेने खरंच आपल्या आचार विचार कसे समृद्ध होतात याचा स्वानुभव घेतल्यावरच अनुभूती येते.म्हणून तर म्हणतात "वाचाल तर वाचाल"**



जयश्री सोमनाथ बोधेकर

बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय कोल्हापूर-

इचलकरंजी नागरी,

महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन.

Email: jayshribodhekar@gmail.com

“राज्य शासनात काम करत आहे हे केवळ SPM कॉलेजच्या ग्रंथालय मधील अभ्यासिका मुळेच”

“2000 मध्ये BA पूर्ण झाले नंतर SPM कॉलेजच्या कुणा सोबत काहीही संपर्क आला नव्हता. मात्र श्री. बारड सर यांनी SPM कॉलेजच्या ग्रंथालय मधे स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या साठी अभ्यासिका सुरू केली आहे असे कळले. खरं तर त्या वेळी आज प्रमाणे फास्ट मीडिया सोर्स नव्हते . स्पर्धा परीक्षा तयारी साठी औरंगाबाद आजच छत्रपती संभाजीनगर किवा पुणे येथे जावे लागते असा पक्का समज झालेला होता. मी अतिशय सामान्य घरात वाढले असून असे परीक्षा तयारी साठी बाहेर गावी जाऊन रहाणे अजिबात शक्य नव्हते. पण स्पर्धा परीक्षा याचे, त्या वेळी एक वेगळेच आकर्षण होते. त्यामुळे या गावातील SPM कॉलेजच्या ग्रंथालय मधे जायचे असे ठरविले. रोज अभ्यासिका मधे गेल्या नंतर वाचनीय असे खूप पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिक आणि त्या अनुषंगाने श्री बारड सर यांनी केलेले बहुमोल असे मार्गदर्शन मिळाले. श्री बारड सर यांनी आम्हाला फक्त अभ्यासिकाच उपलब्ध करून दिली असे नाही तर कुठली पुस्तके वाचायला हवीत, कुठल्या विषयावर चर्चा करण्यात यावी, असे विविध प्रकारचे मार्गदर्शन केले. या अभ्यासिका मुळे आमचा खुप छान ग्रुप तयार झाला. या ग्रुप मधे अनेकदा स्पर्धा परीक्षा निगडित चर्चा होऊ लागल्या आणि विविध प्रकारच्या परीक्षा देण्यासाठी तयारी सुरू झाली. अनेकदा यश, अपयशाचे प्रसंग आले. मात्र ग्रंथालय मधे गेल्या नंतर आपण नक्कीच

**यशस्वी होऊ असे सकारात्मक विचार मनात येत होते. आज मी राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागात काम करत आहे हे केवळ SPM कॉलेजच्या ग्रंथालय मधील अभ्यासिका मुळेच, खरंच श्री बारड सर यांची मी कायम ऋणी आहे. त्यांच्या ग्रंथालय मधील अभ्यासिका या प्रकल्प मुळे माझ्या सारख्या अनेक सामान्य घरातील मुलींना व मुलांना यश संपादन करता आले....खरंच बारड सर तुम्हाला मनापासुन खुप खुप धन्यवाद! तसेच पुढच्या वाटचालीसाठी  खूप खूप शुभेच्छा !”**



**Prof. Pravin Trambak Kad**

EMail: pravinkad25@gmail.com

9850543061

**प्रवीण त्र्यंबक कड (एम.कॉम, एम. फिल ,सेट, नेट )**

(बी. कॉम. शैक्षणिक वर्ष २००८-०९ ते २०१०-०११)

(सहायक प्राध्यापक) मराठवाडा मित्र मंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, डेक्कन, पुणे.

---

जशी वृक्षाची महानता त्याच्या मधुर व रसदार फळांमुळे समजते त्याचप्रमाणे महाविद्यालयाची महानता ही त्यातून घडलेल्या सुजाण, सुसंस्कारी आणि प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्वांमधून सिद्ध होते. यात महाविद्यालयाचे ग्रंथालय महत्वपूर्ण योगदान देत आहे. ते केवळ पुस्तकांचे घर नसून घराच्या रूपात 'ज्ञानाचे मंदिर' आहे.

आपल्या महाविद्यालयातून शिकलेले विद्यार्थी आज देशभरातच नव्हे तर जगभरातदेखील आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. शिक्षणरूपी महाविद्यालयाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे याचा मनस्वी आनंद होत आहे.

कुठल्याही व्यक्तीच्या जगण्याचे तीन निकष असतात. जगण्याला लांबी, रुंदी आणि उंची असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेतलेले, त्यांना आयुष्याकडे बघण्याचा 'दृष्टिकोन' देणारे व कित्येक विद्यार्थ्यांच्या 'आयुष्याचा गुरु' असलेले प्रा. डॉ. प्रदीप बारड सर यांच्या ग्रंथालय सेवेला पंचवीस वर्ष पूर्ण होत आहेत, त्याबद्दल त्यांना मन: पूर्वक शुभेच्छा आणि हार्दिक अभिनंदन !!!

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे सर म्हणजे एक सुहृद आणि कुशल नेतृत्व ! 'विद्यार्थी हा कॉलेजचा आत्मा असतो' हे ब्रीद प्रमाण मानून त्यांनी महाविद्यालयाच्या हितासाठी घेत असलेले निर्णय महाविद्यालयाला उंच शिखराकडे नेत आहेत.

महाविद्यालय हे आपलं एक कुटुंबच आहे. त्यात आपण सर्वांनी गुण्या-गोविंदाने राहावे, विद्यार्थी मित्रांनी भरपूर अभ्यास करून चांगले गुण मिळवावे. आपलं आणि आपल्या आई- वडिलांचं नाव मोठं होईल असं कर्तृत्व करावं तद्वतच महाविद्यालयाचंही नाव आणखी मोठं करावं. आम्ही 'बी' घडलो , तुम्ही बी घडा ...

**'घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती,**

**तिथे असावा प्रेम जिव्हाळा नकोत नुसती नाती '**

महाविद्यलयात गुरुजनांकडून मिळणारे प्रेम, आपुलकी , जिव्हाळा यामुळे हे महाविद्यालय प्रत्येक विद्यार्थ्याला 'माझं महाविद्यालय' वाटतं . **दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती !**



योगेश सिसोदे

कक्ष अधिकारी,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक

"आपल्या रौप्यमहोत्सवी सेवेला सलाम सर"

आपल्या रौप्यमहोत्सवी सेवेला सलाम सर ? आपण आपल्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन जीवनात जे ग्रंथाविषयी,विविध पुस्तक वाचनाचे बाळकडू पाजले ती सवय अजूनही कायम आहे sir, मला शासकीय सेवेमध्ये रुजू होऊन 12 वर्षे होत आहेत अजूनही मी नियमितपणे माझे शासकीय काम आटोपून पुस्तक वाचनाला वेळ देतो व ही सवय फक्त आपल्यामुळेच लागली सर आपण माझ्या आयुष्यात आला नसता तर एखाद्या कुठल्यातरी कानाकोपऱ्यात मी एखाद्या भंगार अवस्थेत पडलेलो असतो,आपण आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये विविध प्रकारच्या पुस्तकाचे असलेले नियोजन की ज्यामध्ये स्पर्धापरीक्षा, विविध प्रकारची साहित्य संपदा असो, विविध प्रकारचे वर्तमानपत्र, विविध प्रकारची मासिके याचे छान नियोजन आम्ही विद्यार्थ्यांनी स्वत: अनुभवले व त्यामुळेच आम्ही जीवनामध्ये कुठल्यातरी एका छोट्याश्या यशस्वी पायरीवर आहोत,, इतकेच नाहीतर सर मला आपल्याला सांगायला आवडेल की प्रत्येक जण आपल्या वैवाहिक जीवनात प्रवेश केल्यानंतर शक्यतोवर अभ्यास करत नाही,परंतु मी नोकरी, कौटुंबिक जबाबदारी सांभाळत माझी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक तेथे कक्ष अधिकारी या पदावर नेमणूक झालेली आहे, एवढेच नाही तर आपल्या महाविद्यालयातून मी पदवी प्राप्त केल्यानंतर अर्थिक अडचणीमुळे मला कोणती तरी शासकीय नोकरी मिळवणे आवश्यक होते त्यामूळे माझी पदव्युत्तर पदवी मी करू शकलो नाही तर मी माझे MSW नुकतेच IGNOU येथून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केले आहे, हे सर्व आपल्या प्रेरणेतूनच होऊ शकले सर ?



एडवोकेट प्रीती जाधव अवचार,

उच्च न्यायालय, नागपूर

स्वप्नांना बघायला वास्तवाचे डोळे लागतात \ स्वानांना जिंकायला यशाचे बळ लहान.

यशस्वी होण्यासाठी कष्टोय प्रयत्न लागतात. \ त्या प्रयत्नांना बळ येण्यासाठी गुरुचे अशिर्वाद लागतान

आज मला माझे गुरु डॉ. प्रदिप बारड सर यांचे बददल लिहिताना माझ्या मनातील आदर-सम्मान, प्रेम आपुलकी आज सर्वांसमोर व्यक्त करायला मिळाले याचा मला खूप अगदी मनापासुन आनंद होत आहे. पण हे तितकंच कठिण सुहदा वाटत आहे कारण बारड सरांन बददल बोलणे हे माझ्या साठी छोट्या तोंडी मोठा घास घेणे आहे असे आहे पण तरीही मी स्वताला भाग्यवान समजते आणी सरांन बददल असलेला आदर व्यकत करण्याचा छोटासा प्रयल करते.मी सन 2005-2006 या वर्षी ११ वी ला आर्टस ला प्रवेश घेतला खरं सांगायच तर तेव्हा माझी अवस्था ही अंधारलेल्या बंद खोलीत काळया रंगाची टोपी सापडेन अशी होती. कदाचित माझ्या वयाच्या सर्वच विद्यार्थ्यांची अवस्था तशी असावी आणी बाकीच्या प्रमाणे या वयान मला भविष्यात काय बनायचं आहे हे दखल नाहन आणी विचा ही केला नव्हता.परंतु एकदा अचानक डॉ बारड सरांनी अचानक एका कॉर्नर मीटिंगमध्ये आम्हा सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालात असणाऱ्या नवीन पुस्तकाबद्दलची त्या पुस्तकातील मस्कराबद्दलची आणि आयुष्यात काही बनायचे असेल तर वाचनाची सवय वाढवायला पाहिजे या संदर्भात माहिती दिली त्यामुळे आम्ही लायब्ररीत गेल्याशिवाय त्या दिवशी आम्हाला करमले नाही. काही दिवसांनी महाविद्यालयामध्ये त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभ्यासक्रमाची सुरुवात केली त्यामध्ये एमपीएससी मधून निवडून आलेले अधिकारी त्यांचा आम्हाला सत्कार करायला परिचय करायला मिळत होता आणि त्याच्यातून आमची प्रतिमा आमच्या मनामध्ये निर्माण होत होती.

बारडसर आणि आमच्या शिक्षकांची टीम सतत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असते सरांच्या विद्यार्थ्यांबद्दल प्रामाणिक आणि आदर्श व्यक्ती होण्याकडे भर असतो विद्यार्थ्यांना महाविद्यालय जीवनात कसे वागले पाहिजे आणि यशस्वी होण्यासाठी सर नेहमी मदत करत असतात ते आम्हाला नेहमी मोलाचा सल्ला देत होते आजही ते विद्यार्थ्यांना देत आहे ज्या

**विद्यार्थ्यांची परिस्थिती हालाखीची आहे त्यांना मदत करणे ते करीत असतात आज त्यांच्या या मार्गदर्शनामुळे आणि माझ्या आई-वडिलांमुळे मी आज उच्च न्यायालया येथे वकील करीत आहे. सरांनी जो आत्मविश्वास माझ्यामध्ये निर्माण केला त्या जोरावरच मी गेली 17 वर्षे नागपूर येथे वकिलीचा व्यवसाय यशस्वीरित्या करीत आहे यासाठी सगळे श्रेय सरांचे आहे. आणि माझे यशस्वी जीवन माझे स्वप्न आज पूर्ण झाले आहे.**



**Amol Prakashrao Jadhav (Deshmukh)**
**Designation -PSI**
**Present Posting -Nagpur City**

**वाणिज्य विषयाचे विद्यार्थी सहसा स्पर्धा परीक्षेकडे कमी प्रमाणात वळतात. आम्ही बी.कॉम ला असताना सुद्धा ग्रंथालयात असणाऱ्या स्पर्धा परीक्षा केंद्रामुळे आम्ही स्पर्धा परीक्षा बद्दल आमच्या मनात गोडी निर्माण झाली. त्यातूनच आम्ही शिकत असताना श्री इब्राहिम चौधरी सर उपजिल्हाधिकारी झालेत त्यामुळे आम्ही स्पर्धा परीक्षेत करियर करण्याचे मनाशी बाळगून महाविद्यालयाच्या पदवीच्या तिन्ही वर्षात ग्रंथालयाचा पुरेपूर वापर करून घेतला. यश मिळायला थोडा वेळ लागला परंतु महाविद्यालयात जीवनात मिळालेलं वातावरण आम्हाला यशस्वी करण्यापर्यंत घेऊन गेले.**



**सुनील जाधव**

**आदरणीय, गुरुजन वर्ग,**

**ग्रंथालय विभाग प्रमुख Dr.बारड सर,**

**शिक्षक प्रसारक मंडळ तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये शिकत असतांना मला ग्रंथालयाची खूप मदत झाली.माझ्या वाचनात भर पडली आणि वाचनाची आवड निर्माण झाली त्याचा फायदा मला स्पर्धा परीक्षा देत असताना होतोय. या महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंधाचे मला मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.**



**Dr. Pravin Prakashrao Kulkarni**
**Assistant Professor,**
**Arts Commerce and Science College Maregaon**
**Dist -Yavatmal.**

**“ सरांनी आम्हालाही वाचनाची आवड निर्माण करून वाचन केल्याने भविष्यात होणारे फायदे समजावून सांगितले”**

**सन्माननीय डॉ. बारड ग्रंथालय विभाग प्रमुख सर एस पी एम महाविद्यालय चिखली यांना प्रथम नमस्कार !**

**सरांची आणि माझी प्रथम ओळख सन 2008 ला झाली तेव्हापासून सरांनी आम्हाला वाचनाची आवड निर्माण करून दिली सरांना पुस्तके जमवण्याची आणि वाचण्याची अत्यंत आवड त्यांनी जोपासली आहे. आम्ही विद्यार्थी दशेत असताना सरांनी आम्हालाही वाचनाची आवड निर्माण करून वाचन केल्याने भविष्यात होणारे फायदे समजावून सांगितले आणि आज आमच्यामध्ये वाचनाची जी गोडी निर्माण झाली त्याचे सर्वश्रेय सन्माननीय बारड सरांना जाते सर नेहमी आम्हाला सांगायचे की वाचन हे मनुष्यामध्ये विचार करण्याची क्षमता निर्माण करून मनुष्यामध्ये सृजनशीलता निर्माण करण्यास मदत करते वाचनाची आवड असल्यामुळे राष्ट्र समाज आणि माणूस म्हणून उन्नती होते. आणि ह्या सर्व गोष्टी आम्हाला बारड सरांनी ग्रंथालयामध्ये ग्रंथालयाचे महत्त्व पटवून देऊन शिकवले आहेत वाचण्याची आवड जोपासल्याने मनुष्याने मनुष्याशी आणि समाजाशी कसे वागावे कोणत्या गोष्टी हितकारक आहेत आपल्यासाठी समाजासाठी आणि राष्ट्रासाठी या सर्व बाबी ओळखण्यास मदत होते आमच्यामध्ये आज जी वाचण्याची आवड निर्माण झाली आहे ही केवळ ग्रंथालयामुळे आणि श्री बारड सरांमुळे त्यामुळे आपल्या जीवनात ग्रंथालयाचे आणि ग्रंथालय प्रमुखाचे महत्त्व अन्यसाधारण आहे जसे की मनुष्याच्या शरीरामध्ये रक्ताचे महत्त्व आहे.**



**Tulshidas P.  Gawai**

(Clerk )

Chief Metropolitan Magistrate Court,

Esplanade Mumbai.

.In my college days after attending all lectures rest of times i used to spend on readings the books and newspaper which were made available in the library for students the library service and environment is pretty good for the real bibliophile. on the other had the librarian Shri Prof. Pradip Himmatrao Barad sir had given us proper guidance for career as well as bright future. I hope all the students will gain their knowledge by availing the library services.



**SATISH SAKHARAM BHARAD**.
STATE BANK OF INDIA
(Cash In Charge) Mumbai.
E-mail satish.bharad88@gmail.com

Libraries provide access to resources and materials that might not be available

affordable, allowing students to further their learning, understanding, and research. Furthermore, libraries provide a safe and welcoming space for students to study and interact with other students and community members.



राम भगवान पालकर

सहाय्यक प्राध्यापक

समाज भूषण अप्पासाहेब जेधे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शुक्रवार पेठ पुणे.

rampalkar143@gmail.com

पहिल्यांदाच तालुक्याच्या गावाला कॉलेजमध्ये शिकायला गेलो आणि सर्व काही नवीन असताना कॉलेजमध्ये गेल्यावर पहिल्यांदा लायब्ररीमध्ये गेल्यावर अशी सुसज्ज व दोन मजली लायब्ररी पहिल्यांदाच बघितली जरा लाजत लायब्ररीमध्ये गेलो होतो परंतु प्रथम डॉ.बारड सर यांच्यासोबत झालेली भेट आजही लक्षात आहे त्यांनी आमची संपूर्ण विचारपूस केली व यापुढे लायब्ररीमध्ये दैनंदिन यावे असे सांगितले व कुठलीही अडचण आल्यास बिनधास्तपणे सांगावी असे म्हटले सरांच्या भेटीमुळे आम्हाला तालुक्याच्या गावाला कॉलेजमध्ये शिकण्यासाठी आत्मविश्वास मिळाला व त्यापुढे मी नियमित सरांच्या मार्गदर्शनाखाली लायब्ररीमध्ये अभ्यास करत असे कुठलीही अडचण सरांकडे नेली असल्यास सरांनी ती ताबडतोब सोडवली ग्रंथालयामध्ये नवीन संदर्भ पुस्तक नवीन मासिक वृत्तपत्र हे आमच्यासाठी उपल्ध करून दिले व ग्रंथालयात नेहमी अभ्यसाला येणाऱ्या विद्यार्थ्यांना २६ जानेवारीला सन्मानित केले जाते त्यामुळे आमच्या यशामध्ये सरांचा मोलाचा वाटा आहे सर आम्हाला नेहमी प्रोत्साहन देत होते या प्रोत्साहनामुळेच आम्हाला आमच्या यशापर्यंत पोहोचता आले सरांना ग्रंथपाल म्हणून 25 वर्ष पूर्ण होत आहे हे ऐकून खूप आनंद झाला सरांचे या पंचवीस वर्षांमध्ये शेकडो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले व शेकडो विद्यार्थी हे चांगल्या पदावर आज कार्यरत आहेत हे सरांच्या गेल्या 25 वर्षाच्या कारकिर्दीचे फळ आहे असे म्हणता येईल .सरांना पुढील वाटचालीसाठी मनपूर्वक हार्दिक शुभेच्या !



**शैलेश सुरेश म्हस्के**

**पोलिस उप निरीक्षक**

डिजिटल माध्यमांमुळे नक्कीच एकाग्रता कमी होत असते. मग ध्येयापासून आपण दूरावतो. शेवटी निराशाच हाताला येत असते.

यातून बाहेर पडण्याचा सर्वोच्चतम मार्ग म्हणजे "अभ्यासिका"! अभ्यासिकांमध्ये कमालीची शांतता , नवनवीन वाचनाची ओढ, सामाजिक मूल्य, थोरपुरुष, विचारवंत, संशोधक, यांना जवळून बघण्याची अनुभूती येते.

बिकट परिस्थितीत सुद्धा अनुकूलता शोधण्यास मदतही होते. दिशादर्शक उपक्रम राबविल्याने सर्वांगीण विकास होण्यास मदत मिळते आणि म्हणूनच आम्हाला आपल्या कॉलेज च्या अभ्यासिकेचा व बारड सर ने केलेल्या मार्गदर्शनामुळेच यश संपादन होऊ शकले..एसपीएम कॉलेज च्या सर्व विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर उपयोग घ्यावा व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा !



**प्रा. रवींद्र सुभाष सोनोने. ( ग्रंथपाल )**

**महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय,**

**बुलढाणा.**

**मी एस. पी. एम. कॉलेज चिखली, येथे 2005 ला ग्रॅज्युएशन पूर्ण करीत असताना माझा संपर्क ग्रंथपाल प्रा. डॉ. प्रदीप बारड सर सोबत आला. त्यांनी मला स्पर्धा परीक्षा वगैरे संबंधित खूप चांगले मार्गदर्शन केले. आणि मला ग्रंथालयाची गोडी लावली. त्यातूनच मी स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतानाच मी ग्रंथालय या विषयाकडे जास्त प्रमाणात आकर्षित झालो .आणि सरांच्या मार्गदर्शनात मी बि.लीब, एम.लीब ला प्रवेश घेऊन चांगल्या चांगल्या पद्धतीने उत्तीर्ण झालो. नेट/ सेट करीत असताना ग्रंथालय शास्त्र या विषयाकरिता सरांनी मला अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले आणि त्यामुळेच मी नेट/ सेट उत्तीर्ण होऊ शकलो.**

**सरांनी मला कधीच मार्गदर्शन करण्यात नाही म्हटले नाही. मी यापुढे पी.एच.डी. माननीय सरांच्या मार्गदर्शनात पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे.**



आदरनीय सर धन्यवाद ,

आपण कुठे आहोत, याला तर महत्व आहेच
परंतु याही पेक्षा जास्त महत्व आहे. ते आपण
कोठून आलो याला, कुठल्या परिस्थितीतून आलो
कुणाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले
आणि ते म्हणजे आपण आहात सर,
म्हणून सर्व प्रथम धन्यवाद बारड सर,

सन २००४ ते २००५ मधील म्हणजे १७ ते १८ वर्षे पूर्वीचा कालावधी शिक्षण एम.ए. बीड झालेले शासकीय नोकरीच्या शोधत ,स्पर्धा परीक्षा द्यायची परंतु स्पर्धा परीक्षा विषयी माहिती सविस्तर नव्हती.

त्यावेळेस असे समजले की एस.पी.एम. कालेज मधील लायब्ररी मध्ये स्पर्धा परीक्षा देणारे बरेच विद्यार्थी आभ्यासाठी येतात आणी त्यांना तेथे मार्गदर्शन देखील मिळते, मी देखिल एस.पी.एम. कालेजची विद्यार्थिनी आहे. म्हणून ठरविलेले आपण देखिल एस.पी.एम. कालेजची लायब्ररी गाठायची आणि लायब्ररी गाठल्यावर तेथे भेट झाली ती लायब्ररीयन आदरनीय प्रदीप बारड सर यांच्याशी, सराशी भेट झाल्याबरोबर समजले की सरांना स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मुलाविषयी खूपच आत्मीयता आहे, आणि त्यांची मनापासून धडपड होती या स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थीन साठी काहीतरी करावे जसजशी सरांनासोबत चर्चा होत गेली सरांचे मार्गदर्शन मिळत गेले तसतसा आत्मविश्वास देखिळ प्रबळ होत गेला.

रोज नियमितपणे लायब्ररी मध्ये जायचे तेथेच जयश्री बोधेकर, विद्या पोपट , विवेक ईवरकर सर, राजू निळे सर, राहुल पवार, यांच्या सोबत भेट झाले अजूनही बरेच विद्यार्थी होते. हळूहळू मस्त ग्रुप जमला, आभ्यासही मस्त सुरु झाला. लायब्ररी मध्ये रोज न्यूजपेपर, आणि दरमाह चे इतर मासिक ही याचे जसे की लोकराज्य वैगरे त्यामुळे, बराच योजनेची माहिती मिळायची, तसेच सरांनी आमच्या साठी स्पर्धा परीक्षेचे स्टडी सकलचे आनंद पाटील सरांचे आणि भगीरथ चे रंजन कोलबीचे देखिल दरमाह चे मासिक सुरू केले होते. रोजचे न्युज पेपर आणि दर माह चे मासिक यामुळे स्पर्धा परीक्षेतील चालूघडामोडी हा घटक कव्हर होत गेला.

तसेच सरांनी दर रविवारी आमच्या कडून आधी झालेल्या पेपरचे सराव पेपर घेऊन वेळेचे नियोजन करून घेतले, त्यामुळे आमच्या वेळेचे नियोजन तर झालेच परंतु त्याही पेक्षा जास्त फायदा म्हणजे आमच्या छोट्या मोठ्या चुका आमच्या लक्षात येत राहिल्या आणि त्यामध्ये सुधारणा होत गेली.तसे तर सरांचे धन्यवाद कारण त्यांचा सुट्टीचा दिवस देखिल ते आमच्या साठी द्यायचे. तसेच स्पर्धा परिक्षेमधून निवड झालेले बऱ्याच विद्यार्थना सर मार्गदर्शन करण्यासाठी बोलवित असे,त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनचा देखिल आम्हाला खूप फायदा झाला.

त्यावेळेस बऱ्याच गोष्टीचा आभाव असताना देखिल सरांनी आमच्यासाठी ज्या काही सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यामुळेच आज आमच्या ग्रुप मधील सर्व मंडळी शासकीय सेवेत एका चागंल्या पदावर कार्यरत आहेत. आमच्या साठी सरांना देखिल खूप त्रास झाला आणि विरोध देखिल झाला परंतु असो त्याची खंत आमच्या मनात आहेच. परंतु कुठल्याहि परिस्थितीत सरांनी आमचा आत्मविश्वास खचु दिला नाही. म्हणून पुन:छ एकदा सरांचे धन्यवाद.!!

अंनत होते आमचे ध्येय, अंनत होत्या वाटा,
आम्ही गाठले यशाचे शिखर. त्यामध्ये आहे
"बारड सर" तुमचा आहे सिहांचा वाटा,
तुमचा आहे सिहांचा वाटा, सिहांचा वाटा.

नाव :- सुरेखा पुंडलिक जाधव
कार्यालय:- बाल विकास प्रकल्प अधिकारी
कार्यालय नागरी प्रकल्प, बु



# विनोद भानुदास कुटे

आदर्श विद्यालय चिखली

नमस्कार.

प्रा. श्री प्रदीपजी बारड सरांनी कळविल्यानंतर वाचन ग्रंथ ग्रंथालय विषयी लिहिताना व स्वतःचे विचार शब्दात मांडताना मला समाधान वाटत आहे. आयुष्यात अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजा आणि इतकेच ग्रंथ व ग्रंथालयाचे महत्त्व आहे." Let the noble thoughts come to me from all directions." हा विचार पूर्णपणे वास्तवात उतरवण्याचे सामर्थ्य ग्रंथ, ग्रंथालय आणि चौकस ग्रंथपाला मध्ये असते. व्यक्तीची पूर्ण जडणघडण होण्याच्या प्रवासात ज्या महत्त्वपूर्ण गोष्टींचा बाबींचा वाटा असतो त्या ग्रंथालयाला अनन्यसाधारण स्थान आहे. श्री बारड सर एक सज्जन गृहस्थ, संयमी व्यक्तिमत्व, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना सदैव मदत करण्यास तत्पर असणारे, सखोल ज्ञान, अभ्यासू असणारे ग्रंथपाल म्हणून आम्हा सर्वांना परिचित आहेत.

त्यांनी अत्यंत प्रेम व जिव्हाळयाने महाविद्यालयातील ग्रंथालयाचे व त्यातून विद्यार्थ्यांचे संगोपन केले आहे .त्याबद्दल मी येथे कृतज्ञता व्यक्त करतो. सरांचा प्राचार्यांचा व महाविद्यालयाचा मी कायम ऋणी आहे व राहील.

धन्यवाद..



**अमित सिध्देश्वर बकतवार,**

**सहाय्यक पोलीस निरीक्षक, अमरावती**

मी. अमित सिध्देश्वर बकतवार सन 2006 मध्ये शहरातील नामवंत महाविद्यालय म्हणजे SPM येथे बी.ए. करीता प्रवेश ते केवळ पदवी असावी म्हणून आयुष्यात काही विषेश होईल याची स्वप्नात सुध्दा काही कल्पना नव्हती आणि तसापण आयुष्यात काही खास करू हे तर दुरच पण महाविद्यालयात शिक्षण घेत असता एका तरुण प्राध्यापकांशी ओळख झाली ते पण ग्रंथालयीन त्यांनी आम्हाला मैत्री सारखी वांगणूक देवून गप्पा मारण्यासाठी ग्रंथालयात बोलवून घेत चहा पाजत त्यावेळी असा मान आम्हाला कुठे ही नव्हता यातून आमचा परिचय ग्रंथालयाला सोबत पुस्तकांशी झाला आणि वाचणाचे व्यसण लागले कांदबरी च्या पुस्तकाची सुरूवात नोकरी पर्यंत नेईल हे माहित नव्हते. आपण महाविद्यालयात प्रथमच स्पर्धा परीक्षा चे वातावरण आणले यशस्वी लोकांचे पडक्या परिस्थिती आयोजन केले आपल्या या धडपडीचा आणि कष्टाचा परिणाम म्हणजे माझा सारखा सामान्य विद्यार्थी आज पोलीस विभागात अधिकारी म्हणून यशस्वी काम करत आहे. आई वडील प्रमाणे आपला व महाविद्यालयातील ग्रंथालयाचा यात हत्ती चा वाटा आहे कारण जंगलातील तोच प्रत्यक्ष मोठा आहे. आपले रूण्त्व सदा स्मरणात राहील..... धन्यवाद आणि आपणास शुभेच्छा??????



**अनिल तुकाराम जाधव, तलाठी**

**(2022-23 आदर्श तलाठी पुरस्कार प्राप्त)**

**जिल्हा सचिव विदर्भ पटवारी संघ बुलढाणा.**

**तहसील कार्यालय चिखली, जिल्हा बुलढाणा.**

**माझे अकरावी आणि बी.ए. चे शिक्षण शिक्षण प्रसारक मंडळाच्या आदर्श विद्यालय आणि तात्यासाहेब महाजन महाविद्यालय येथे झाले माझे आश्वास सर्वात मोठे शैक्षणिक ग्रंथालय म्हणजे महाविद्यालयाचे ग्रंथाल होय मी या ग्रंथालयात माझी वाचण्याची आवड अधिकृत केली. बरीच पुस्तके मासिके पक्षिकेतून माझ्या वाचनात आली व माझ्या ज्ञानात यामुळे भर पडत गेली सर आपण ग्रंथालयामार्फत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन अभ्यासिका सुरू केली होती तेव्हा मी आपल्याकडे ग्रंथालय शास्त्राचा विद्यार्थी म्हणून इंटरनॅशनल करिता येत होते तेव्हा मी स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रमाची सुरुवात केली. माझ्या जीवनामध्ये या ग्रंथालयामुळे योग्य दिशा मिळत गेली मी माझ्या जीवनामध्ये सुखी समाधानी आनंदी आहे याला खरे कारण म्हणजे माझी या ग्रंथालयात विकसित झालेली वाचन चळवळ माझ्या जीवनातील महाविद्यालय ग्रंथालयात चे महत्व मी घालवलेल्या वेळ व यातून मिळालेले मला ज्ञान आणि यश हे या ग्रंथालयाचे श्रेय आहे. दा.सू .वैद्य यांनी "पुस्तक सांगतात गोष्ट" ही कविता माझ्या आयुष्यात मी इथूनच आत्मसात केली. करिता आपणास व महाविद्यालय ग्रंथालयास माझ्या खूप खूप शुभेच्छा.**



राजीव परशुराम निळे,

कनिष्ठ सहाय्यक ,

शिक्षण विभाग जालना.

वाढते वय व या अनुषंगाने आलेली बेरोजगारी त्यामुळे त्रस्त होतो परंतु एके दिवशी एसपीएम कॉलेजच्या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा अभ्यासाकरिता अभ्यासिका सुरू झाल्याचे कळले त्यामुळे माहितीस्तव तिथे गेलो तिथे गेल्यावर प्रथम अशात्मक ग्रंथपाल श्री प्रदीप जी बारात सर यांची भेट झाली त्यांनी आपली सगळया सुरू करण्याच्या उपक्रमाबद्दल माहिती दिली उद्देश व महत्त्व पटवून दिले व अशा पद्धतीने थोडा अंतरा अंतराच्या खंडानंतर माझा अभ्यास सुरू झाला कॉलेजचा मी माजी विद्यार्थी असल्यामुळे भारत सरांनी मुला तात्काळ प्रवेश दिला अर्थात ही दोन ही गोष्ट 2500 आहे त्या काळात अभ्यासकेत गटचर्चा धर्मा एका प्रशासकीय अभ्यासिक अधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन यामुळे या कालावधीत बरेच काही शिकायला मिळाले तसेच प्रत्यक्ष सरांकडून बहुमूल्य असे मार्गदर्शन प्राप्त झाले त्या काळातील सरांची भेट झाली नसती तर माझ्या आयुष्यात मी आज जेथे आहोत तेथे नसतो. सरांमुळे माझ्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळाली मी माझ्या आयुष्यात जे काही अल्प प्रमाणात यश प्राप्त केले त्यामध्ये सरांचा मोठा वाटा आहे त्यामुळे ईश्वरचरणी मी अशी प्रार्थना करतो की सरांची उत्तरोत्तर अधिक प्रगती हो व त्यांच्या हातून कार्य घडवून त्यांना आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य लाभो या सदस्य ग्रंथालय वाचक म्हणून माझी त्यांना खूप खूप शुभेच्छा.




**अश्विनी सदाशिवराव मुळे**

**पीएच.डी. संशोधक (मराठी विभाग)**

ग्रंथालय म्हणजे ज्ञान आणि संस्कृतीचे प्रवेशद्वार. समाजात शिक्षणाचे प्रसार करण्याची महत्वाचे कार्य ग्रंथालयामार्फत पार पाडले जाते. वेगवेगळ्या वयोगटातील लोक आणि अभ्यास करणारे विद्यार्थी ग्रंथालयाचा वापर करून आपले ज्ञान वाढवत असतात. शिक्षणामुळे जागरूकता येते, ज्ञानामुळे व्यक्ती समृद्ध होतो, यामध्ये ग्रंथालये मोलाची भूमिका पार पाडतात. ज्ञानाचे भांडार हे पुस्तकाच्या माध्यमातून ग्रंथालयात साठवलेले असते. समृद्ध ग्रंथालय हे ज्ञानवृद्धीसाठी अत्यंत आवश्यक आहे

मी अश्विनी सदाशिवराव मुळे शि. प्र. म.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,या महाविद्यालयाची संशोधक विद्यार्थिनी असून संशोधन कार्यात मला ग्रंथालयाची मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. महाविद्यालयाचे ग्रंथालय हे विविध महत्त्वपूर्ण ग्रंथांनी समृद्ध असून महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. डॉ. प्रदीप बारड सर यांचे महत्वपूर्ण मार्गदर्शन आम्हा विद्यार्थ्यांना लाभत गेले. संशोधना व्यतिरिक्त इतर पुस्तके वाचण्यासाठी त्यांनी आम्हाला नेहमीच प्रेरित केले. पुस्तकाचे ठिकाण व पुस्तकाच्या नोंदवहीचे व्यवस्थापन याबद्दल सर फार आग्रही आहेत.ग्रंथालयातील विविध साहित्य पर पुस्तकांनी माझ्या संशोधन कार्याला नवी दिशा मिळाली, त्याबद्दल मी महाविद्यालयाची व डॉ. बारड सरांची मनापासून आभारी आहे.



प्रा. सुनिता अभिमान अवचार

व्यंकटेश महाविद्यालय, वाशिम.

पीएच.डी. संशोधक (मराठी विभाग)

किताबें करती है बातें बीते ज़माने की कल की आज की तुम नहीं सुनोगे किताबों की बाते"

महाविद्यालयात असताना खुप मोठ ग्रंथालय विधार्थ्यांसाठी होत.मी त्यावेळी "मला उध्वस्त व्हायचं ",बिनपटाची चौकट" ही पुस्तक वाचली. पुस्तकाच्या सहवासात अनेक व्यक्तिचित्रण वाचता येतात.माझ्या आवडीचे पुस्तक भेटलं ते वाचता आले .जयंत पवार यांच्या कथासंग्रह" फिनिकच्या राखेतून उठला मोर" डॉ बाबासाहेबां आंबेडकर यांचे पुस्तक वाचनाचे वेड प्रेरणादायी आहे .त्यांचा आदर्श ठेवूनच ग्रंथालय कडे ही पावले वळली.आमचे ग्रंथपाल डॉ बारड सर नेहमी विद्यार्थील नवीन पुस्तके आली की त्याची माहिती आधीच देतात. अनेकांना पुस्तकाच्या या दालनांची ओळख करून देतात.

त्यामुळे आम्हा ग्रामीण भागातील विद्यार्थांसाठी ग्रंथालय अत्यंतमहत्वाची भूमिका पार पाडते.वाचण संस्कृतीचे खऱ्या अर्थाने टिकून राहते .या ग्रंथालयामुळे त्याच बरोबर लेखन संस्कृती टिकून राहते.त्यामुळे ग्रामीण विद्यार्थाना ग्रंथालय फार मोठी प्रेरणा आहे.वैचारिक ठेवण ही पुस्तक तयार करतात..

"किताबें कुछ कहना चाहती है तुम्हारे पास रहना चाहती है ...."



**श्री. विजय सुखदेवराव निमजे,**

**पीएच.डी. संशोधक (इतिहास विभाग)**

**सहाय्यक शिक्षक,शाळा - आडी महाड खाडी,**

**ता. म्हसळा, जि. रायगड, महाराष्ट्र**

दिव्याने दिवा लावावा हीच आपली परंपरा.. तसेच ज्ञानाने ज्ञान वाढवावे हाच खरा ज्ञानाचा अर्थ म्हणता येईल. मी श्री विजय सुखदेवराव निमजे पीएचडी संशोधक विद्यार्थी मला हे सांगताना अत्यंत आनंद वाटतो की आपल्या महाविद्यालयाचे ग्रंथालय व तेथील असणारे ग्रंथपाल आदरणीय श्री. बारड सर तसेच सर्व कर्मचारी यांनी मला संशोधन कार्यासाठी हवी असणारी पुस्तके वारंवार उपलब्ध करून दिली. ती उपलब्ध करून देताना कधी त्रागा केला नाही. पुस्तके उपलब्ध करून देताना उत्साह व सहकार्याची वृत्ती त्यांच्यात दिसत होती. त्यामुळे मला संशोधनासाठी ग्रंथालयाची मोलाची मदत मिळाली. ग्रंथालयातील सर्व कर्मचारी सौजन्यशील, विनम्र आणि सहकार्य वृत्तीचे असल्यामुळे मला नेहमी त्यांच्याशी आपुलकी वाटली. पुस्तकं शोधून देताना ती पुस्तकं मिळाल्यावर जे समाधान दिसत होते, ते अमूल्य होते.

ज्या प्रमाणे ग्रंथालयातील पुस्तकं वाचकाला हसवतात, रडवतात आणि अनेक जीवन जगायला शिकवतात त्याचप्रमाणे एक सुयोग्य ग्रंथपाल चांगली पुस्तकं उपलब्ध करून वाचकाला नवी दिशा मिळवून देतो. आपण सर्वांनी मला संशोधन कार्यासाठी ग्रंथालयाच्यामाध्यमातून जे सहकार्य केले ते अनमोल आहे. त्यामुळे मी ग्रंथालयाचा ऋणी आहे.



सचिन विजय वाघमारे,संशोधक विद्यार्थी

शिक्षण प्रसारक मंडळ तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,चिखली.

डॉ. प्रदीप बारड सर म्हणजे चालते फिरते ग्रंथालय.

शिक्षण प्रसारक मंडळ तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय हे माझ्यासाठी तसे नवीनच. मी मराठी या विषयांमध्ये पीएचडी करण्यासाठी मार्गदर्शकाच्या शोधात होतो. मला समजले की प्राचार्य डॉ. गव्हाणे सर यांच्याकडे मराठी विषयाची जागा खाली आहे. मी प्राचार्य सरांना भेटलो व माझा मनोदय त्यांना बोलून दाखविला. त्यांनी मला मार्गदर्शनासाठी होकार दिला आणि महाविद्यालयाचे ग्रंथपाल व पीएचडी कोर्स वर्क विभागाचे प्रमुख डॉ. बारड सरांना भेटण्यास सांगितले.ते तुम्हाला कोर्स वर्क संदर्भात मार्गदर्शन करतील असे सांगितले. मी लगेचच ग्रंथालयामध्ये गेलो. डॉ.बारड सर समोरच बसलेले होते. सरांची परवानगी घेऊन मी ग्रंथालयामध्ये प्रवेश केला. सर आपल्या कामात मग्न होते. मी सहजच ग्रंथालयात आजूबाजूला नजर फिरवली. ग्रंथालयातील पुस्तके रॅकवर व्यवस्थित ठेवलेली होती. बाजूलाच काही मुले वर्तमानपत्राचे तर काही मुले पुस्तकांचे वाचन करत होती. सरांची आणि माझी ही पहिलीच भेट होती. सरांना मी माझा परिचय करून दिला व माझ्या विषयासंदर्भात त्यांना सांगितले. आमचं बोलणं सुरू झालं. त्या दिवशी चक्क दीड तास सरांनी मला मार्गदर्शन केले. विषय कसा निवडावा, विषय निवडताना कोणती काळजी घ्यावी, शोध प्रबंधाचे लेखन कसे करावे, संदर्भ कसे घ्यावेत व संदर्भ कोणत्या पद्धतीने लिहावेत, कोर्स वर्क चा अभ्यासक्रम व त्यासाठी कोणती पुस्तके रेफर करावीत, याचे सखोल अशा प्रकारचे मार्गदर्शन सरांनी मला केले. एका महाविद्यालयाचे प्रोफेसर पहिल्याच भेटीत एका अनोळखी विद्यार्थ्याला एवढा वेळ देऊन मार्गदर्शन करतात यावर माझा विश्वास बसत नव्हता परंतु हे सत्य होते. नंतर बऱ्याच वेळा कामानिमित्त व पुस्तकांसाठी सरांकडे जाणे झाले. मागितलेली पुस्तके सर आम्हाला देत व तेही काही पुस्तकांची नावे सुचवीत त्यांचेही आम्ही वाचन करत असू. शोध प्रबंधाचा आराखडा तयार करतानाही त्यांची खूप मदत झाली. आम्हा संशोधकांकडून काही चुका झाल्यास परखडपणे ते आम्हाला बोलत असत. ते म्हणत,"आजकालचे संशोधक संशोधन कार्य करताना फार सिरीयस घेत नाहीत त्यांना छोट्या छोट्या बाबी सुद्धा माहित नाहीत". आणि लगेचच ते आम्हाला सर्व समजावून सांगत. सर शिस्तीचे भोक्ते. सर फणसाप्रमाणे आहेत .वरून कठोर पण आतून तितकेच प्रेमळ. आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून देखील ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. सरांकडे अफाट ज्ञान आहे, त्यांचे वाचन खूप आहे,

विद्यार्थ्यांविषयी तळमळ, कोणतेही अडचण आली असता सरांना विचारले की ते आमची समस्या सोडवतात. मोबाईलच्या माध्यमातूनही ते आमच्या समस्या सोडवतात. ग्रंथपालाच्या कक्षेच्या बाहेर जाऊन ते विद्यार्थ्यांसाठी कार्य करतात. पुस्तक देणे व घेणे एवढ्या पुरतेच आपले कार्य मर्यादित न ठेवता आपल्या ज्ञानाचा विद्यार्थ्यांना फायदा

झाला पाहिजे या दृष्टिकोनातून सरांचे कार्य आहे. बारड सर म्हणजे मूर्ती लहान पण कीर्ती महान.आपल्याआयुष्यात आपण कोणाच्या सानिध्यात राहतो ,कोणाची साथसंगत करतो आणि कोणाला आदर्श मानतो ,याचा खूप मोठा परिणाम होत असतो.सरांनाभावी आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा.